**<u>शपथेवर फिर्यादीचा उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.के.एस.त्रिभुवन यांच्या मार्फत नि.क्र.१८ वर शपथेवर पुढे सुरु.</u>**

**१३.** माझी आणि आरोपीची पुर्वीची ओळख आहे. आमच्यात वाहन विक्रीचा व्यवहार होण्यापूर्वी एक महिन्या आगोदर आमची ओळख झाली होती. मी स्वतः ट्रक चालवतो. एका ट्रक पासुन दरमहा ७० ते ७५ हजार उत्पन्न मिळते. एमएच–२८–बीबी–४४८८ हा ट्रक दि.२६.१२.२०२२ रोजी विकत घेतला. सदर ट्रकचा आरोपी दुसरा मालक आहे. याची मी खात्री केली होती. मी वाहन नोंदणी प्रमाणपत्र पाहिले होते. सदरचा वाहनाचा मी २० महिने व्यावसाईक कामासाठी वापर केला. सदर वाहनावरील फायनान्सचे जे कर्ज होते त्याबद्दल मी फायनान्स काडुन ''एन.ओ.सी'' घेतली नाही. सदर वाहन घेताना मी फायनान्सचे किती हप्ते शिल्लक आहेत हे मी पाहिले होते. आम्ही औरंगाबाद येथील ''टि.व्ही.एस.क्रेडीट'' या फायनान्स कार्यालयामध्ये गेलो होतो. मी स्वतः क्रेडीटवर फायनान्स घेतलेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, फायनान्स घेताना सुरक्षेपोटी कोरे धनादेश सही करुन दिले जातात. प्रत्येक हप्त्यासाठी एक धनादेश दिला जातो. मला माहित नाही की, शेवटचे दोन हप्ते राहिल्यानंतर त्या दोन धनादेशाचा वापर करुन त्यावर हप्त्याची रक्कम टाकुन धनादेश वापरले जातात.

**१४.** आरोपीचे माझ्याकडे दोन कोरे धनादेश नव्हते. मला असे वाटले की, पैसे मिळतील म्हणुन ७ लाख रुपयांचा धनादेश अनादरीत झाला तरी मी पुन्हा २ लाख रुपयांचा धनादेश बँकेत वटण्यासाठी जमा केला. हे म्हणणे बरोबर आहे की, टि.व्ही.एस. फायनान्सला रक्कम रुपये २१,६३,६००/– भरण्याचे ठरले होते. कराराची मुळ प्रत मी फाईलवर अपलोड केलेली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, दि.२६.१२.२०२२ पासुन मी वाहनाच्या ताब्याबाबत सर्व जबाबदारी स्विकारलेली आहे. करार करताना मी आरोपीच्या मालकी हक्काची पुर्ण खात्री करुन घेतली होती. करारानंतर मी प्रति महिना ६०,१००/– प्रमाणे एकुण २० हप्ते असे एकुण रक्कम रुपये १२ लाख २ हजार फायनान्सकडे जमा केलेले आहेत. माझ्याकडे २२ महिने वाहन असताना मी एक वेळेस ट्रकची सर्विसिंग केली होती. हे म्हणणे बरोबर नाही की, मी आरोपीने मला ट्रक

विकल्यानंतर त्या ट्रकचा नंबर बदलुन मी त्या ट्रकचा वापर केला.

**१५.** हे म्हणणे बरोबर आहे की, आरोपीवर ट्रकच्या बाबत कोणताही गुन्हा दाखल नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मी २० हप्ते भरल्यानंतर उरलेले १६ हप्त्याचे ९ लाख रुपये आरोपी फायनान्स कंपनीला देणे लागत आहे. आरोपीला टी.व्ही.एस. क्रेडीटने अजुनही ''नो ड्युस'' दिलेले नाही. पुन्हा सांगतो की, मला माहित नाही, वादग्रस्त धनादेश मधील ९ लाख रुपये मी फायनान्स कंपनीला जमा करनार नव्हतो.

**प्रश्न** – तुम्हाला ९ लाख रुपये आणि फायनानस्ला ९ लाख रुपये आरोपी देणे लागतो असे तुमचे म्हणणे आहे का ?

**उत्तर** – हो.

**१६.** जप्त केलेला वादग्रस्त ट्रक हा नांदेड पोलीसांच्या ताब्यात आहे. ट्रकचा आरोपीच्या पुर्वीचा मालक हा श्री.भाऊसाहेब पोखरे आहे. आरोपीने श्री.पोखरे यांच्याकडे ट्रक विकत घेतल्यानंतर ''टि.व्ही.एस'' फायनान्सचे कर्ज घेतलेले आहे. फायनान्स कंपनी ट्रकच्या मालकीची खात्री केल्यानंतर त्यावर फायनान्स कर्ज देते आणि तशी नोंद आर.सी.बुक ला घेते. आर.सी.बुक. ला कर्जाची नोंद होती. आमच्या मध्ये असे ठरले होते की, आरोपीने भरलेले हप्ते वजा करुन उर्वरीत हप्ते मी भरायचे. आरोपीने भरलेले फायनान्सचे ५ लाख ६३ हजार रुपये मी आरोपीकडे करार करण्यापूर्वी आरोपीच्या खात्यात बँकेद्वारे जमा केले होते. दि.२२.१२.२०२२ पासुन मी असे मान्य केले होते की, आर.टी.वो.केस, इन्सुरन्स क्लेम, पोलीस केस आणि अपघात केसची जबाबदारी माझी राहील. हे म्हणणे बरोबर नाही की, मी करारनाम्याचे पालन केलेले नाही.

**१७.** हे म्हणणे बरोबर आहे की, दि.२२.१२.२०२२ पासुन माझ्याकडे वाहनाची सर्व जबाबदारी असल्यामुळे पोलीसांनी माझ्या ताब्यातून ट्रक जप्त केला ही जबाबदारी माझी होती. हे म्हणणे बरोबर आहे की, ती जबाबदारी मी पार पाडलेली नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, आरोपीने फायनान्स भरण्यासाठी दिलेले कोरे चेक चा मी गैरवापर केला. हे म्हणणे बरोबर नाही की, त्यावर मी माझ्या मनाप्रमाणे रक्कम टाकुन धनादेश अनादर

करविले. हे म्हणणे बरोबर नाही की, आरोपी माझे स्वतःचे ९ लाख रुपये देणे लागत नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, फिर्यादीतील सर्व मजकुर खोटा आणि चुकीचा आहे.

**(पुढील उलटतपास आरोपीच्या वकिलांच्या विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब)**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PISAL DHANANJAY SHRIRAM
Date: 2026.03.16 18:17:04 +0530

ठिकाण : वैजापुर

दिनांक : १२/०३/२०२६.

**डी. एस. पिसाळ**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, वैजापूर.